मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# डीपी प्लानवर 56 हजार 779 हरकती; निम्म्याहून अधिक सुनावणी पूर्ण!

## भोसरी, डुडुळगाव, चिखलीच्या हरकतींवर सुनावणी; १५ डिसेंबरपर्यंत डीपी शासनाकडे

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारुप विकास योजना आराखड्यावर (डीपी प्लान) तब्बल ५६ हजार ७७९ हरकती दाखल झाल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. या हरकतींवर आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात ३ ऑगस्टपासून सात सदस्यीय समितीच्या माध्यमातून सुनावणी सुरू असून, आतापर्यंत शहरातील सात भागांतील २८ हजार ७२५ हरकतींवर सुनावणी पूर्ण झाली आहे. आता सोमवारपासून भोसरी, डुडुळगाव आणि त्यानंतर चिखली परिसरातील हरकतींवर सुनावणी घेतली जाणार आहे.**

महापालिकेने सुधारित प्रारुप विकास योजना आराखडा १५ मे २०२५ रोजी प्रसिद्ध केला होता. त्यावर १४ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत तब्बल ५६ हजार ७७९ हरकती दाखल झाल्या. अनेक हरकती एकाच विषयाशी संबंधित असून, काही आरक्षणांवर मोठ्या प्रमाणात हरकती दाखल झाल्या आहेत. सुनावणीदरम्यान प्रत्येक हरकतदाराचे म्हणणे संपूर्णपणे ऐकून घेतले जात आहे.

आत्तापर्यंत पिंपरी, तळवडे, थेरगाव, रहाटणी, दिघी, मोशी आणि ताथवडे या सात भागांतील २८ हजार ७२५ हरकतींवर सुनावणी झाली आहे. सार्वजनिक सुट्ट्यांमुळे काही दिवस प्रक्रिया बंद राहिल्याने सुनावणीच्या वेळापत्रकात बदल झाला आहे. उर्वरित हरकतींवरील सुनावणीही निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे.



### सुनावणीचे वेळापत्रक

भोसरी परिसरातील हरकतींवर सोमवार (दि. २१) आणि मंगळवार (दि. २२) सुनावणी होणार आहे. डुडुळगाव परिसरासाठी गुरुवार (दि. २४) सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. तर चिखली परिसरातील हरकतींवर २८ व २९ सप्टेंबर तसेच १, ५ आणि ६ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या वेळेत सुनावणी घेतली जाणार आहे.

सोमवारपासून भोसरी परिसरातील हरकतींवर दोन दिवस सुनावणी होणार आहे. त्यानंतर डुडुळगाव परिसरातील हरकतींवर सुनावणी घेतली जाईल. पुढील टप्प्यात चिखली परिसरातील हरकतींवर सुनावणी होणार असून, या भागात हरकतींचे प्रमाण मोठे असल्याने त्यासाठी अनेक दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. चिखली परिसरातून तब्बल ४ हजार ३१८ हरकती दाखल झाल्या आहेत.

नोटीस मिळूनही काही नागरिक सुनावणीला उपस्थित राहू शकले नाहीत. अशा नागरिकांना संपूर्ण सुनावणी प्रक्रिया झाल्यानंतर पुन्हा आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाणार आहे. शेवटच्या टप्प्यात विविध शासकीय यंत्रणांकडून दाखल करण्यात आलेल्या हरकतींवर सुनावणी घेतली जाणार असल्याचे नगररचना विभागाकडून सांगण्यात आले.

महापालिकेने १५ डिसेंबर २०२६ पर्यंत हरकतींवरील संपूर्ण सुनावणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. त्यानंतर सुधारित डीपी अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे आगामी काळात उर्वरित हजारो हरकतींवरील सुनावणीला वेग येणार आहे.

### रिंगरोडच्या आरक्षणाला सर्वाधिक विरोध!

थेरगाव परिसरातून एचसीएमआर (रिंगरोड) मार्ग प्रस्तावित करण्यात आला असून, त्यासोबतच विविध ठिकाणी प्रशस्त रस्त्यांची आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहेत. या प्रस्तावित आरक्षणांविरोधात नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात हरकती दाखल करण्यात आल्या. सुनावणीच्या वेळी नागरिकांचा मोठा प्रतिसाद दिसून आला असून, ग. दि. माडगूळकर नाट्यगृही नागरिकांनी भरून गेले होते. मोशी परिसरातील प्रस्तावित आरक्षणांबाबतही मोठ्या संख्येने हरकती दाखल झाल्या असून, खासगी जागांवरील आरक्षणांचा मुद्दा त्यात प्रमुख आहे.

# शेअर मार्केटमध्ये 'मोठ्या परताव्या'चे आमिष; पिंपरीत १० लाखांचा गंडा!

» पिंपरी | प्रतिनिधी

**शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका व्यक्तीची तब्बल १० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पिंपरी गाव परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीने गुंतवणुकीनंतर ठरल्याप्रमाणे रक्कम अथवा नफा परत न करता फिर्यादीची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे.**



याप्रकरणी रवींद्र सुभाषराव शिलवंत (वय ४८, रा. श्री साई अपार्टमेंट, मंजुळा मासुळकर पार्क, पिंपरीगाव) यांनी पिंपरी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यानुसार उमेश हरिराम कलानी (वय अंदाजे २८, रा. कृष्णा सायकलसमोर, पिंपरी) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एप्रिल २०२४ ते १९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पिंपरी गाव परिसरात हा प्रकार घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने स्वतःचा यू.के. ग्रुप ऑफ कंपनीशी संबंध असल्याचे सांगत फिर्यादी तसेच इतर काही व्यक्तींना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रवृत्त केले. शेअर मार्केटमध्ये १० लाख रुपयांची गुंतवणूक केल्यास पहिल्या दहा महिन्यांत दरमहा एक लाख रुपये, म्हणजेच एकूण १० लाख रुपये परत मिळतील, तसेच त्यावर अतिरिक्त नफाही मिळवून दिला जाईल, असे आश्वासन आरोपीने दिले होते.

आरोपीने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून फिर्यादीने १० लाख रुपये गुंतवले. मात्र, पैसे गुंतवल्यानंतर ठरल्याप्रमाणे परतावा देण्यास आरोपीने टाळाटाळ केली. मूळ रक्कम परत मिळाली नाही तसेच नफ्याची रक्कमही देण्यात आली नाही. फिर्यादीने वारंवार आरोपीशी संपर्क साधून गुंतवलेले पैसे परत मागितले. मात्र, त्यानंतरही रक्कम परत न मिळाल्याने आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

यानंतर रवींद्र शिलवंत यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात धाव घेत संपूर्ण प्रकाराची तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी उमेश कलानी याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, आरोपीने दिलेली आश्वासने आणि संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक चिरंजीव दलालवाड करीत आहेत.

# आर. के. एल. गॅलक्सी स्कूलची धडाकेबाज कामगिरी'!

## एल्प्रो मॉलमध्ये गॅलक्सी स्कूलचा दबदबा; नाटक अव्वल, नृत्य उपविजेते

**पिंपरी | प्रतिनिधी**

**एल्प्रो मॉल येथे पार पडलेल्या भव्य आंतरशालेय नाट्य आणि नृत्य स्पर्धेत आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या चमकदार कामगिरीने बाजी मारली आहे. शहराभरातील अनेक नामांकित शाळांच्या चुरशीच्या स्पर्धेत या विद्यार्थ्यांनी उत्तम कलागुणांचे प्रदर्शन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.**



या स्पर्धेत आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या नृत्य संघाने अत्यंत लयबद्ध, आकर्षक आणि कलात्मक नृत्याचे सादरीकरण करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. नृत्याच्या विविध शैलींचा सुरेख मिलाफ, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि सादरीकरणातील अचूकता यामुळे त्यांच्या नृत्याला विशेष दाद मिळाली. त्यांच्या या बहारदार सादरीकरणाची न्यायाधीशांनीही प्रशंसा करत संघाला ‘प्रथम उपविजेतेपद’ (फर्स्ट रनर-अप) बहाल करून गौरवण्यात आले.

दुसरीकडे, शाळेच्या नाट्य संघाने आशयघन आणि प्रभावी विषयावर आधारित नाटक सादर करत संपूर्ण नाट्यगृहावर आपली छाप पाडली. विद्यार्थ्यांचा दमदार अभिनय, प्रभावी संवादफेक, रंगमंचावरील आत्मविश्वास आणि सादरीकरणातील उत्कृष्ट समन्वय यामुळे नाटकाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रभावी सादरीकरणाची दखल घेत नाट्य संघाने स्पर्धेतील प्रतिष्ठेचा ‘सर्वोत्कृष्ट नाटक पुरस्कार’ (बेस्ट ड्रामा अवॉर्ड) पटकावला.

या दुहेरी यशामुळे आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन, प्राचार्य आणि शिक्षकवृंदाने आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, कलेप्रती असलेली निष्ठा, सातत्यपूर्ण सराव आणि मार्गदर्शक शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच हे यश साध्य झाल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही नमूद करण्यात आले.

“आमच्या विद्यार्थ्यांचे हे यश अत्यंत अभिमानास्पद आणि कौतुकास्पद आहे. कला, नाटक आणि नृत्याच्या क्षेत्रात त्यांनी दाखवलेली सर्जनशीलता आणि मेहनत खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पणाला जाते. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन!”

**- डॉ.पुष्कर चौबे , ( CEO ) आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूल.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये १७ हजार ५०० अनधिकृत नळजोड; १३ हजार ५०० अधिकृत!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत नळजोडांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महापालिकेने अनधिकृत नळजोड शोधण्यासाठी ठेकेदारामार्फत सुरू केलेल्या विशेष सर्वेक्षणात आतापर्यंत तब्बल १७ हजार ५०० अनधिकृत नळजोड आढळून आले आहेत. त्यापैकी १३ हजार ५०० नळजोड नियमित करून त्यावर पाणीमीटर बसविण्यात आले आहेत. या कामासाठी आतापर्यंत सुमारे २६ कोटी रुपये खर्च झाले असून, उर्वरित नळजोडांची पडताळणी सुरू आहे.**



शहरात सुमारे सात लाख ८४ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यापैकी सुमारे दोन लाख अधिकृत नळजोडधारक आहेत. हाऊसिंग सोसायट्यांमधील सामूहिक नळजोड तसेच अनधिकृत जोडणीमुळे मालमत्तांच्या तुलनेत अधिकृत नळजोडांची संख्या कमी असल्याचे महापालिका प्रशासनाचे म्हणणे आहे. शहरातील पाणीगळती आणि पाणीचोरीमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचे नुकसान होत असून, त्याचा परिणाम महापालिकेच्या पाणीपट्टी उत्पन्नावरही होत आहे.

पाणीगळती, पाणीचोरी रोखण्यासोबतच पाणीपट्टीचे उत्पन्न वाढविण्यासाठी महापालिकेने २०२३ मध्ये अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी विशेष मोहीम राबविली होती. या मोहिमेला तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली. नागरिकांना अनधिकृत नळजोड अधिकृत करण्यासाठी अनामत रक्कम न घेण्याची सुविधाही देण्यात आली होती. मात्र, नागरिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये मिळून केवळ १ हजार ६७३ नागरिकांनी नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज केले.

त्यानंतर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने अनधिकृत नळजोड शोधण्याचे आणि ते नियमित करण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अनधिकृत नळजोडांचे सर्वेक्षण आणि मीटर बसविण्यासाठी ३२ कोटी रुपयांचे काम डिसेंबर २०२४ पासून सुरू करण्यात आले. या कामाची मुदत २४ महिन्यांची आहे. आतापर्यंत शहरातील तीन लाख सात हजार ९५० मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात झोपडपट्ट्यांसह विविध भागांत १७ हजार ५०० अनधिकृत नळजोड आढळून आले.

यापैकी १३ हजार ५०० नळजोड अधिकृत करण्यात आले असून, त्यावर पाणीमीटर बसवून संबंधित मालमत्ताधारकांना पाणीपट्टीची आकारणी सुरू करण्यात आली आहे. उर्वरित अनधिकृत नळजोडांची पडताळणी सुरू आहे. सर्वेक्षणाची मुदत संपण्यासाठी आणखी चार महिने शिल्लक असून, या कालावधीत संपूर्ण शहरातील सर्वेक्षण पूर्ण करण्याचे नियोजन पाणीपुरवठा विभागाने केले आहे. अनधिकृत नळजोड नियमित केल्यानंतर ठेकेदारामार्फत पाणीमीटर बसविण्यात येत आहेत. निवासी आणि बिगरनिवासी इमारतींसाठी नळजोडाच्या व्यासानुसार मीटर बसविण्यासाठी साधारण दहा हजार रुपयांपासून पुढे खर्च येत आहे. हा खर्च संबंधित नळजोडधारकांकडून पाणीपट्टीच्या दरमहा बिलातून १५० रुपये याप्रमाणे हप्त्याने वसूल करण्यात येणार आहे.

### डिसेंबरपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे नियोजन

शहरातील अनधिकृत नळजोडांचे सर्वेक्षण सध्या वेगाने सुरू आहे. आतापर्यंत १७ हजार ५०० अनधिकृत नळजोड आढळून आले असून, त्यापैकी बहुतांश नळजोड नियमित करण्यात आले आहेत. डिसेंबरपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सर्वेक्षणात आढळणारे अनधिकृत नळजोड नियमित करून त्यावर पाणीमीटर बसविण्यात येत असून, त्यानुसार पाणीपट्टीची आकारणी केली जात असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश बरिदे यांनी सांगितले.

### पाणीगळती, चोरी रोखण्यावर भर!

पिंपरी-चिंचवड शहराला पवना धरणातून ५२० एमएलडी, आंद्रा धरणातून ९० एमएलडी आणि एमआयडीसीकडून ३० एमएलडी असे एकूण ६४० एमएलडी पाणी दररोज मिळते. मात्र, यापैकी सुमारे ४० टक्के पाण्याची गळती अथवा चोरी होत असल्याचा पाणीपुरवठा विभागाचा दावा आहे. अनधिकृत नळजोड अधिकृत करून त्यावर मीटर बसविल्यानंतर पाणीवापराचे अचूक मोजमाप होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे पाणीगळती आणि चोरीला आळा बसण्यासोबतच महापालिकेच्या पाणीपट्टीच्या उत्पन्नातही वाढ होण्याची अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# महापालिका भवनाचा खर्च फुगणार; 286 कोटींच्या प्रकल्पावर अतिरिक्त भार!

## चार इमारती अंतिम टप्प्यात; एसटीपी, फर्निचर अन् अजितदादांच्या पुतळ्यामुळे खर्च वाढणार!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नव्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले असतानाच या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा खर्च वाढत चालला आहे. चिंचवड येथील सायन्स पार्कच्या शेजारी उभारण्यात येत असलेल्या महापालिका भवनाच्या बांधकामासाठी सुरुवातीला २८६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता. मात्र, आता एसटीपी, पाण्याची टाकी, ड्रेनेज व्यवस्था, फर्निचर, विद्युत कामे, सुशोभीकरण तसेच आवारातील इतर कामांसाठी आणखी मोठा खर्च होणार आहे. त्यातच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा पूर्णाकृती पुतळा आणि 'अजितसृष्टी' उभारण्यात येणार असल्याने प्रकल्पाचा आर्थिक भार आणखी वाढणार आहे.**



सायन्स पार्कच्या शेजारी महापालिकेच्या मालकीची एकूण ३३.८६ एकर जागा असून, त्यापैकी ८.६५ एकर जागेवर नवीन महापालिका भवन उभारले जात आहे. या ठिकाणी १८ मजली दोन आणि सहा मजली दोन अशा एकूण चार पर्यावरणपूरक इमारती बांधण्यात येत आहेत. या कामाला जानेवारी २०२३ मध्ये सुरुवात झाली. मूळ तीन वर्षांची मुदत जुलै २०२५ मध्ये संपली असून, त्यानंतर देण्यात आलेली अतिरिक्त मुदतही संपली आहे. तरीही प्रकल्पाचे काम अद्याप सुरूच आहे.

मूळ निविदेतील बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महापालिका भवनाच्या आवारातील मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्र (एसटीपी), पाण्याची टाकी, ड्रेनेजलाईन, तसेच विविध विभागांसाठी आवश्यक फर्निचरची कामे करण्यात येणार आहेत. या कामांसाठी स्वतंत्र निविदा काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पात या विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मूळ बांधकाम खर्चाच्या तुलनेत प्रकल्पाची एकूण किंमत मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

पिंपरी येथील सध्याच्या महापालिका भवनाचे उद्घाटन १३ मार्च १९८७ रोजी तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्या हस्ते झाले होते. या इमारतीला आता सुमारे ४० वर्षे झाली आहेत. दरम्यानच्या काळात पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने झाला असून, शहराची लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या विविध विभागांसाठी पुरेशी जागा उपलब्ध व्हावी, तसेच नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा मिळाव्यात, यासाठी नवीन प्रशासकीय भवन उभारण्यात येत आहे.

नवीन महापालिका भवनाच्या दर्शनी भागात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. या पुतळ्याची उंची सुमारे २२ मीटर असणार असून, त्याच्या परिसरात विद्युत रोषणाई, कारंजे आणि सुशोभीकरण करण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र निविदा काढली जाणार असून, पुतळ्याचा आराखडा अंतिम करण्याची प्रक्रिया अद्याप बाकी आहे. पुतळ्यासोबत 'अजितसृष्टी' उभारण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

नवीन महापालिका भवनात सहा ते १८ मजल्यांच्या चार इमारती असणार आहेत. प्रत्येक इमारतीला तीन बेसमेंट असून, येथे नागरी सेवा केंद्र, ई-गव्हर्नन्स सेंटर, ग्रंथालय, क्लिनिक, प्रदर्शन हॉल, संग्रहालय, बहुउद्देशीय सभागृह, पत्रकार कक्ष यांसह विविध सुविधा उपलब्ध असणार आहेत. नगरसेवकांची संख्या लक्षात घेऊन भव्य सभागृह आणि स्वतंत्र दालनेही प्रस्तावित आहेत.

इमारतीत ४७९ चारचाकी आणि २ हजार ७१३ दुचाकी वाहने उभी करता येतील, अशी पार्किंग व्यवस्था असणार आहे. तसेच एकूण १६ लिफ्टची सुविधा असेल. विविध विभागांतील सुमारे २ हजार ६८९ अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आसन व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे महापालिकेचे बहुतांश विभाग एकाच ठिकाणी कार्यरत होऊन नागरिकांना विविध कामांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याची गरज कमी होणार आहे. पुणे-मुंबई जुन्या महामार्गालगत हा प्रकल्प असल्याने रस्ते, मेट्रो, बीआरटीएस आणि ई-आरटीएसच्या माध्यमातून सार्वजनिक वाहतुकीची जोडणीही उपलब्ध होणार आहे.

### मुदत उलटूनही काम सुरूच; कारवाईची मागणी

महापालिका भवनाचे काम निर्धारित मुदतीत पूर्ण न झाल्याने ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे प्रकल्पाचा खर्च वाढत असल्याचा आरोप करण्यात येत असून, कामातील विलंबाची चौकशी करण्याचीही मागणी केली जात आहे. बांधकामादरम्यान होणारे ध्वनी व वायू प्रदूषण तसेच कामगारांच्या सुरक्षेचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.

# भोसरीत बांगलादेशी महिलेवर एटीबीचा शिकंजा; बनावट आधारकार्डासह ताब्यात!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या दहशतवाद विरोधी शाखेने (एटीबी) भोसरी परिसरात अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या आणखी एका बांगलादेशी महिलेचा शोध घेत कारवाई केली आहे. गोविंद गार्डन परिसरात सुरू केलेल्या शोधमोहीमेदरम्यान ही महिला आढळून आली. तिच्याकडील आधारकार्ड बनावट असल्याचे तपासात समोर आल्यानंतर तिला ताब्यात घेण्यात आले असून, पुढील कारवाईसाठी भोसरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तिच्या बांगलादेशात हद्दपारीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**



एटीबीला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोविंद गार्डन शेजारील परिसरात एक बांगलादेशी महिला अनधिकृतपणे राहत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार १८ सप्टेंबर २०२६ रोजी एटीबीच्या पथकाने परिसरात शोधमोहीम राबविली. यावेळी डायमंड लॉज येथे 'लवली रोविंदर जाट' या नावाने राहणारी महिला पोलिसांना आढळून आली.

तिच्याकडील कागदपत्रांची तपासणी केली असता आधारकार्ड बनावट असल्याचे निष्पन्न झाले. अधिक चौकशी केली असता महिलेने आपले खरे नाव लवली मो. अबु बकर सिद्दीक शेख (वय २९) असून, ती बांगलादेशातील खुलना जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे सांगितले. सुमारे दोन वर्षांपूर्वी बांगलादेशातून अनधिकृतपणे भारतात प्रवेश केल्याची माहितीही तिने चौकशीदरम्यान दिली. सध्या ती मध्य प्रदेशातील इंदौर येथे राहत असल्याचे तपासात समोर आले आहे.

तसेच, मोबाईलवरील फेसबुक मेसेंजरच्या माध्यमातून ती बांगलादेशातील मुलगा, आई आणि इतर नातेवाईकांच्या संपर्कात असल्याचेही पोलिसांच्या तपासात आढळून आले. त्यानंतर तिला पुढील कारवाईसाठी भोसरी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. परकीय नागरिक नोंदणी शाखेमार्फत संबंधित महिलेला बांगलादेशात हद्दपार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, गृह मंत्रालयाच्या २ मे २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आढळणाऱ्या अनधिकृत बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करून त्यांना हद्दपार करण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. त्यानुसार २ मे २०२५ ते १९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत एटीबीने एकूण ३० बांगलादेशी नागरिकांचा शोध घेतला आहे. त्यापैकी २६ जणांना बांगलादेशात हद्दपार करण्यात आले असून, उर्वरित चार जणांच्या हद्दपारीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, डॉ. बसवराज तेली आणि विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त धीरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी शाखेच्या पथकाने केली.

# म्हाडाच्या 4 हजार 462 सदनिकांची सोडत लांबणीवर!

## १५ ऑक्टोबरपर्यंत अर्जाची संधी; २६ नोव्हेंबरला सोडत, त्याच दिवशी सायंकाळी विजेत्यांची नावे जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा) ४ हजार ४६२ सदनिकांच्या सोडतीचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, आता सदनिकांची सोडत २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता काढण्यात येणार आहे. सोडतीतील विजेत्या अर्जदारांची नावे त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहेत.**




पुणे मंडळातर्फे १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण आणि २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनांतील सदनिकांच्या वितरणासाठी २४ ऑगस्ट रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी सुरुवातीला १५ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, अनेक अर्जदारांना आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करताना तसेच त्यांच्या पडताळणी प्रक्रियेत अडचणी येत असल्याने अर्ज करण्याची मुदत आणखी एका महिन्याने वाढवून १५ ऑक्टोबर करण्यात आली आहे. या मुदतवाढीमुळे इच्छुक अर्जदारांना कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे.

अर्जदारांना आर्थिक वर्ष २०२४-२५ किंवा २०२५-२६ या दोन वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षाचा उत्पन्न दाखला अथवा प्राप्तिकर विवरणपत्र सादर करण्याची मुभा यापूर्वीच देण्यात आली आहे. त्यामुळे उत्पन्नाच्या कागदपत्रांबाबतची अडचण दूर करून अधिकाधिक पात्र अर्जदारांना या सोडत प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. अर्जदारांनी अंतिम मुदतीपूर्वी ऑनलाइन अर्ज आणि अनामत रकमेची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

स्वीकृत अर्जांची प्रारूप यादी १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे. या यादीत नाव किंवा अर्जासंदर्भात काही त्रुटी अथवा आक्षेप असल्यास अर्जदारांना १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत दावे-हरकती नोंदवता येणार आहेत. प्राप्त दावे-हरकतींची छाननी केल्यानंतर स्वीकृत अर्जांची अंतिम यादी २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता जाहीर केली जाणार आहे.

यानंतर बहुप्रतीक्षित ४ हजार ४६२ सदनिकांची सोडत २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता काढण्यात येणार आहे. सोडतीमध्ये कोणत्या अर्जदारांची निवड झाली, याची विजेत्यांची यादी त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे अर्जदारांनी सुधारित वेळापत्रकातील प्रत्येक तारखेची आणि वेळेची नोंद घेऊन अर्ज, अनामत रक्कम तसेच दावे-हरकतीची प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### असे आहे सुधारित वेळापत्रक!

ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. ऑनलाइन अनामत रक्कम त्याच दिवशी रात्री ११.५९ वाजेपर्यंत भरता येणार आहे. तसेच आरटीजीएस किंवा एनईएफटीद्वारे अनामत रक्कम भरण्यासाठी १६ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

# पेट्रोल पंपांवर डिजिटल व्यवहारांचा बोजा; एमडीआरमधून सवलतीची मागणी!

**पुणे | प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' आणि रोखरहित अर्थव्यवस्थेच्या धोरणाला पेट्रोलियम विक्रेत्यांचा पूर्ण पाठिंबा आहे. मात्र, पेट्रोल पंपांवर होणाऱ्या डिजिटल व्यवहारांसाठी आकारण्यात येणाऱ्या मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर) तसेच अन्य व्यवहार शुल्कातून पेट्रोल पंपांना पूर्णपणे सवलत द्यावी, अशी मागणी पेट्रोल डीलर्स असोसिएशन पुणे आणि फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स असोसिएशनने केली आहे. मर्यादित डीलर मार्जिनमध्ये व्यवसाय करताना डिजिटल व्यवहारांवरील शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.**



पेट्रोल पंपांवर ग्राहकांना यूपीआय, क्यूआर कोड, डेबिट-क्रेडिट कार्ड तसेच अन्य डिजिटल पेमेंटच्या सुविधा सातत्याने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. रोखरहित व्यवहारांना प्रोत्साहन देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला पेट्रोलियम विक्रेत्यांनीही सहकार्य केले आहे. बहुतांश ग्राहकांकडून आता इंधन भरण्यासाठी डिजिटल पेमेंटचा वापर केला जात असल्याने पेट्रोल पंपांवरील डिजिटल व्यवहारांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मात्र, पेट्रोलियम पदार्थांच्या किमती नियंत्रित असताना विक्रेत्यांना मिळणारे डीलर मार्जिन निश्चित आणि मर्यादित आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक डिजिटल व्यवहारावर आकारण्यात येणारे एमडीआर तसेच अन्य व्यवहार शुल्क हा पेट्रोल पंप चालकांच्या खर्चात अतिरिक्त भर घालणारा ठरत असल्याचे संघटनांनी म्हटले आहे. डिजिटल व्यवहारांची सुविधा देताना त्याचा आर्थिक भार विक्रेत्यांवर पडत असल्याने या शुल्काबाबत सरकारने स्वतंत्र धोरण करण्याची गरज असल्याची मागणी करण्यात आली आहे.

पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपरेल यांनी सांगितले की, पेट्रोल डीलर्स 'डिजिटल इंडिया'च्या विरोधात नाहीत. उलट ग्राहकांना जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर डिजिटल पेमेंटची सुविधा मिळावी, यासाठी पेट्रोल पंप चालकांनी सुरुवातीपासून सहकार्याची भूमिका घेतली आहे. यूपीआय, कार्ड आणि क्यूआर कोडसह विविध पर्याय ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मात्र, मर्यादित डीलर मार्जिनमध्ये व्यवसाय चालविताना डिजिटल व्यवहारांवरील एमडीआर आणि इतर शुल्काचा नियमित खर्च सहन करावा लागत आहे. त्यामुळे पेट्रोलियम विक्रेत्यांना डिजिटल व्यवहारांच्या एमडीआरमधून योग्य ती सवलत देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

इंधन ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज असल्याने पेट्रोल पंपांवरील डिजिटल पेमेंट सुविधा कोणत्याही अडथळ्याविना सुरू राहणे आवश्यक आहे. ग्राहकांना रोख रक्कम न वापरता सहजपणे इंधनाचे पैसे अदा करता यावेत, यासाठी डिजिटल व्यवहारांची व्यवस्था कायम ठेवणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. मात्र, त्याचवेळी या सुविधेचा संपूर्ण आर्थिक भार पेट्रोल पंप चालकांवर पडू नये, यासाठी एमडीआर शुल्कातून सवलत देण्याची मागणी करण्यात आली आहे. डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि मर्यादित मार्जिन यांचा विचार करून सरकारने या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका पेट्रोल डीलर्स असोसिएशनने मांडली आहे.

### अर्थमंत्र्यांकडे भेटीसाठी वेळ मागितली

एमडीआरच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेण्यासाठी संघटनेने वेळ मागितला आहे. पेट्रोल पंपांवरील प्रत्यक्ष डिजिटल व्यवहारांची माहिती, व्यवहारांचे प्रमाण आणि त्याचा विक्रेत्यांवर होणारा आर्थिक परिणाम यासंदर्भातील आकडेवारी सरकारसमोर सादर करण्याची तयारी संघटनेने दर्शविली आहे.

### २७ सप्टेंबरला राष्ट्रीय बैठक

पेट्रोलियम डीलर्सची राष्ट्रीय स्तरावरील बैठक २७ सप्टेंबरला होणार आहे. या बैठकीत एमडीआर शुल्क, डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि यूपीआय व्यवहार सुरू ठेवताना पेट्रोल पंप चालकांसमोरील आर्थिक बाबींवर सविस्तर चर्चा होणार आहे. तसेच सरकारसमोर मांडावयाच्या मागण्या आणि पुढील भूमिकेबाबतही या बैठकीत चर्चा केली जाणार आहे.